| | |
|---|---|
| | **भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.४१८/२०१३ मधील**<br>**निशाणी क्रमांक १९ खालील आदेश**<br>(**CNR No. MHWS**050002622012) |

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांच्यातर्फे कलम ९(१) व (२) ची नोटीस, अंतीम निवाडा, सातबारा उतारा, खरेदीखत, मुल्यांकन अहवाल आणि न्यायनिर्णय, यांच्या प्रमाणित व अस्सल प्रती अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार दाखल करु इच्छित असलेल्या कलम ९(१) व (२) ची नोटीस, अंतीम निवाडा, सातबारा उतारा, खरेदीखत, मुल्यांकन अहवाल आणि न्यायनिर्णय, यांच्या प्रमाणित व अस्सल प्रती अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय ? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | .. अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ बाबत** :–

३. अर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा रेफरंन्स अर्जदाराने भुमीसंपादन अधिनियम,१८९४ चे कलम १८ अन्वये दाखल असून प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे. त्यामुळे अर्जदार पुराव्याच्या अनुषंगाने कलम ९(१) व (२) ची नोटीस, अंतीम निवाडा, सातबारा उतारा, खरेदीखत, मुल्यांकन अहवाल आणि न्यायनिर्णय, यांच्या प्रमाणित व अस्सल प्रती दाखल करीत आहे. तरी, त्याची परवानगी देण्यात यावी.

४.  याउलट गैरअर्जदार क्र. २ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, संबंधीत कागदपत्रे दाखल करण्यास अर्जदाराने खूप विलंब केलेला आहे. तरी, अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५.  अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा रेफरंन्स हा अर्जदाराच्या पुराव्याकरीता प्रलंबीत असून, अर्जदार हे कलम ९(१) व (२) ची नोटीस,  अंतीम निवाडा, सातबारा उतारा, खरेदीखत, मुल्यांकन अहवाल आणि न्यायनिर्णय, यांच्या प्रमाणित व अस्सल प्रती दाखल करु इच्छीत आहेत. तसेच आजरोजी अर्जदार हिने तिचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. २१ दाखल केलेले आहे.  तसेच त्या कागदपत्राच्या अनुषंगाने गैरअर्जदार यांना अर्जदार हिचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. ती कागदपत्रे अभिलेखावर आली तर प्रस्तुतचा रेफरंन्स गुणदोषावर निकाली काढण्यास उपयुक्त ठरु शकतात त्यामुळे ते अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि अर्जदार हिच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१.  प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.१९ हा मंजुर करण्यात येत आहे आणि अर्जदार हीस उपरोक्त सत्यप्रती दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२.  खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.09.22 17:18:01 +0530

स्थळ  : मंगरुळपीर
दिनांक : २२.९.२०२५.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 22.9.2025 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 22.9.2025 |
| 5) | Order uploaded on | :- 22.9.2025 |